# साकार

# SAKAR

## Society for Adoption Knowledge Awareness & Resource

# वार्षिक अहवाल

## एप्रिल २०२२ ते मार्च २०२३

# साकार

# SAKAR

**S**ociety for **A**doption **K**nowledge **A**wareness & **R**esource

“अजमेरा कॉम्प्लेक्स,प्लॉट नंबर १७७, ज्योती नगर मेन रोड
ज्योती नगर औरंगाबाद – 431 005
फोन नं – (0240) 2347099, मो. नं. – 9673101760
ई मेल – sakaradoption@gmail.com,
वेबसाईट -www.sakar.org.in
फेसबुक – Sakar NGO
इंस्टाग्राम - sakaradoptionaurangabad

## वार्षिक अहवाल
## एप्रिल २०२२ ते मार्च २०२३

Income Tax Exemption Certificate (80G)

No. AAGTS1368FF20214

FCRA Registration No. 08375011 (Social)

Registered under the Society's Registration Act 21 of 1860

No. MAHA/599/96/A' BAD

&

Bombay Public Trust Act of 1950

Registration No AF-3875 (A' BAD)

# प्रास्ताविक

**सस्नेह नमस्कार**

"साकार", एक शासनमान्य विशेष दत्तक संस्था म्हणून प्रामुख्याने समाजातील परित्यागित बालकांचे योग्य कुटुंबात कायदेशीर दत्तक विधानाद्वारे पुनर्वसन करते. अशा बालकांचे संगोपन हे तर संस्थेचे आद्य कर्तव्य आहेच. त्याचबरोबर त्यांना विविध सोयी सुविधा उपलब्ध करून देणे, तसेच त्यांच्यासाठी विविध उपक्रम राबवून ते दत्तक कुटुंबाचा एक अविभाज्य भाग बनतील, इथपर्यंतचा प्रवास यात ओघानेचे येतो. या सर्व प्रवासात शिशु गृहातील सेविका, "सदन माता" हा एक अत्यंत महत्वाचा घटक आहे हे लक्षात घेऊन त्यांच्यासाठी विशेष कार्य करणे, ह्याला संस्था अग्रक्रम देते. या शिवाय दत्तक कार्याचा प्रचार आणि प्रसार निरंतर सुरु असतोच. विशेष म्हणजे केवळ दत्तक क्षेत्रातील गुणवत्तापूर्ण सेवा समाजापर्यंत पोहचविण्यापुरते मर्यादित कार्यक्षेत्रच "साकार" संस्थेनी राखले नसून समाजातील ज्वलंत समस्यांच्या निराकरणासाठी कार्य केले आहे.

यावर्षी ६ वर्षावरील मोठ्या बालकांचे दत्तक विधानाद्वारे पुनर्वसन हे मोठे जिकिरीचे आणि आव्हानात्मक कार्यही "साकार" संस्थेने यशस्वीरीत्या पार पाडले ही विशेष आनंदाची बाब आहे.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी आम्ही मुलांच्या आणि आयांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध कार्यक्रम घेतले त्यात माहितीपर कार्यक्रमांचा आणि मनोरंजनात्मक कार्यक्रमांचा समावेश होता. या सर्व कार्यक्रमांची माहिती, विस्ताराने अहवालात पुढील काही पानांवर रेखाटली आहे. यावर्षी दत्तक जाणीव जागृती सप्ताहाचे उद्घाटन प्रसिद्ध बालमानसशास्त्रज्ञ आणि समुपदेशक श्रीमती. रेणू गावसकर यांच्या हस्ते करण्यात आले. आणि सप्ताहात विविध दत्तक प्रचारासंबंधित कार्यक्रम घेण्यात आले.

बालविवाह प्रतिबंधासाठी संस्थेने यंदा, औरंगाबाद जिल्ह्यात विद्यार्थी आणि पालकांसाठी जनजागरण केले. त्या शिवाय किशोरवयीन शालेय विद्यार्थ्यांसाठी "क्षितीज" या प्रकल्पाअंतर्गत कुटुंब जीवन शिक्षणा विषयी मार्गदर्शन केले तसेच तरुणाईतल्या संवेदनशील पैलूंविषयी संवाद साधून महाविद्यालयीन युवकांमध्ये समाजभान जगविले. अशा प्रकारे "साकार" संस्थेने २०२२-२०२३ या वर्षात दत्तक क्षेत्रात आणि इतर सामाजिक क्षेत्रांमधील कार्यात सहभाग नोंदविला आहे. उपरोक्त क्षेत्रातील कार्याचा सविस्तर तपशील सदरच्या अहवालात उदधृत केला आहे.

सुचित्रा देशपांडे<br>
**सचिव साकार**

# अध्यक्षांचा संदेश

"साकार" संस्थेचा २५ वर्षांचा प्रवास आणि मिळालेली अपरिमित तृप्ती! हो, खरंच, बघता बघता पाव शतक सरले आणि आठवणींच्या हिंदोळयावर मन पाखरू भिरभिरले.

जानेवारी २०२२ ला घेतलेलं जबाबदारीचं गाठोडं सावरतांना वर्ष भरकन निघून गेलं. कायद्यात वेळोवेळी झालेल्या बदलांशी जुळवून घेत होतो तेवढ्यातच कौमुदी ताई तेलंग गेल्याची बातमी समजली आणि परत एकदा साकारच्या आयुष्यात कुठेतरी छप्पर हरवल्याची भावना निर्माण झाली. त्यांच्यामुळेच सुरु झालेलं हे रोपट होतं. बघता बघता त्याचा वटवृक्ष झाला, जवळपास ४०० घरांशी प्रेमाचे अनुबंध जोडलेले आहेत, ते ही भारतात आणि भारताबाहेरही. अनुभवांनी समृद्ध होतांना या बालकांच्या नशिबाला व भविष्याला उज्ज्वल करु शकलो ह्यातच आम्हा सर्वांचे समाधान सामावलेले आहे. एक सेवाभावी संस्था म्हणून आम्ही गुणवत्तेशी कधीही तडजोड केली नाही. आता सर्वात जास्त लोकसंख्येचा भारत म्हणून त्यातील जेष्ठ आणि श्रेष्ठ वृद्धांसाठी काहीतरी करण्याचा मानस "साकार" परिवाराचा आहे.

## ऋणनिर्देश

संस्थेच्या कार्याची धुरा तिच्या आर्थिक सबलतेवरच अवलंबून असते हे जितकं सत्य आहे, तितकच हे ही सत्य आहे की, संस्थेच्या सचोटीपूर्ण सेवाकार्यावरच समाज, संस्था आणि व्यक्तींचं पाठबळ अवलंबून असतं. या वर्षीची विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे धर्मादाय आयुक्तांच्या शिफारशीमुळे उच्च न्यायालय मुंबई तर्फे मिळालेला भरघोस निधी होय. मा. उच्च न्यायालयाने, सर्व जिल्हास्तरीय धर्मादाय आयुक्तांना गुणवत्तापूर्ण सेवा देणाऱ्या संस्थांची माहिती मागवली होती, त्यात "साकार" संस्थेचे नाव दिले गेले आणि संस्थेला दोन लाख रुपयांचा निधी प्राप्त झाला. मा. उच्च न्यायालयाचे आणि धर्मादाय आयुक्तालयाचे आम्ही अत्यंत आभारी आहोत.

औद्योगिक क्षेत्रातील नामवंत उद्योगसमूहांपैकी "औरंगाबाद इलेक्ट्रिकल्स लिमिटेड" आणि "मॅन एनर्जी लिमिटेड " यांनी सामाजिक दायित्व (CSR) प्रकल्पांतर्गत "साकार" संस्थेस केलेल्या आर्थिक सहाय्याप्रती या दोन्हीही उद्योग समूहांचे मनापासून आभार.

"साकार" संस्थेचे कार्य अविरतपणे समाजापर्यंत पोहचविण्यात शासनाच्या सहकार्याबद्दल ऋणनिर्देश. न्यायव्यवस्था, आयुक्तालय महिला बाल विकास कार्यालय पुणे, विभागीय महिला बाल विकास कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद, बाल कल्याण समिती औरंगाबाद, जिल्हा महिला बाल विकास कार्यालय औरंगाबाद , जिल्हा बाल संरक्षण कक्ष औरंगाबाद या सर्वांच्या सहकार्याशिवाय "साकार" संस्थेचे कार्य पूर्णत्वास जाऊच शकत नाही.

सामाजिक बांधिलकी स्वीकारलेले आमचे देणगीदार आपल्या सुख दु:खाच्या प्रसंगातही आमच्या बाळांची आठवण ठेवून साकार संस्थेस वस्तू तसेच आर्थिक स्वरूपात सहाय्य करतात. त्या सर्वांचे आम्ही अत्यंत ऋणी आहोत. तसेच बाळांना दुध, आहार, औषधं वेळेत पुरविणारे भाजी, किराणा,औषधी विक्रेत्यांचे पण आम्ही शतशः आभारी आहोत.

"साकार" संस्थेच्या सेवाकार्यात सहभागी होणारे वैद्यकीय क्षेत्रातील तज्ञ, कायदेविषयक सेवा पुरविणारे वकील, बाल विकासात भरीव योगदान देणारे आमचे स्वयंसेवक आणि संस्थेच्या उपक्रमात वेळोवेळी सहाय्यभूत ठरणारे सामाजिक कार्य महाविद्यालयचे शिक्षक आणि विद्यार्थी या सर्वांचे "साकार" सदैव ऋणी असेल.

"साकार" संस्थेच्या कार्यात प्रत्यक्ष तसेच अप्रत्यक्ष रित्या सहकार्य करणाऱ्या सर्व संस्था आणि मान्यवरांचे मनापासून आभार!!

# श्रीमती कौमुदी तेलंग यांना भावपूर्ण श्रद्धांजली



**जन्म – ०७/१०/१९३३ मृत्यू – १७/०१/२०२३**


**संस्थापक सदस्य आय. ए. पी. ए.**

"साकार", विशेष दत्तक संस्था हिची स्थापनाच मुळात, "इंडियन असोसिएशन फॉर द प्रमोशन ऑफ ऍडॉप्शन अँड चाइल्ड वेलफेअर (आय. ए. पी. ए.)" या संस्थेच्या पुढाकाराने झाली. १९९३ साली झालेल्या एका परिषदेत मराठवाड्यात दत्तकाचे कार्य करणाऱ्या संस्थेची गरज, त्यावेळच्या आय. ए. पी. ए. च्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली. त्यानुसार आय. ए. पी. ए. चाप्टर म्हणून "साकार" संस्थेच्या कार्याची १९९४ साली सुरुवात झाली. "साकार" संस्थेच्या निर्मिती पासूनच कौमुदी तेलंग यांचे मोठे योगदान आहे. एवढंच नाही तर संस्था उभारणीत सुद्धा कौमुदी तेलंग यांनी साकारच्या पदाधिकाऱ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन केले आहे.शांत, प्रेमळ व अतिशय मनमिळावू स्वभावाच्या कौमुदी ताई "साकार" परिवाराचा कधी अविभाज्य भाग बनल्या कळलेच नाही. त्यामुळे दत्तकाच्या प्रक्रियेतील काही अडचणी आल्यास, दत्तक जाणीव जागृती बाबतचे कार्यक्रम आखण्यास, कार्यकर्त्यांना घडविण्यात, दत्तक पालकांना समुपदेशन करण्यासाठी ह्या किंवा अश्या अनेक संस्थेशी निगडीत विषयात कौमुदी ताईंनी आम्हाला वेळोवेळी मार्गदर्शन केले आहे.

कौमुदी ताईंचे जाणे म्हणजे आमच्या परिवारातील वडीलधारी व्यक्ती गमावण्याचे दुःख आम्हाला आहे. आमच्या मनात त्यांची आठवण सतत तेवत राहीलच पण त्यांनी समाजाला दिलेले योगदान हे अतुलनीय आहे. त्यांच्या अनंत आठवणी आम्ही, "साकार" परिवाराने जपून ठेवल्या आहेत. त्यांच्या आत्म्याला सद्गती लाभलेली असेलच, कारण ज्यांचे अख्खे आयुष्य समाजातल्या गरजू लोकांसाठी काम करण्यात गेलं त्यांच्यासाठी ह्या प्रार्थनेची गरज क्वचितच पडावी, पण तरीदेखील कुठेतरी म्हणावसं वाटतं की त्या चीरकालासाठी ह्या विश्वाच्या शांततेत समाविष्ट झाल्या आहेत. खेद आहे तो या गोष्टीचा की त्या आता आम्हाला भेटणार नाहीत. ईश्वरचरणी एकच प्रार्थना की त्यांच्यातल्या शांततेचा, औदार्याचा काहीसा अंश तरी आम्हाला दे !

**SAKAR**

**Society for Adoption Knowledge Awareness & Resource**



# शिशु संगोपन गृह

० ते ६ वर्ष वयोगटातील काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांचे दत्तकाद्वारे पुनर्वसन हेच साकार संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट असल्याने, शिशु संगोपन गृहातील प्रत्येक प्रवेशित बालकाच्या प्रवेशापासून ते पुढे त्यांना योग्य कुटुंबात दत्तक देण्यापर्यंतचे संगोपन येथे केले जाते. पुढील काही तक्त्यांमध्ये शिशु संगोपन गृहातील बालकांचा तपशील समाविष्ट केला आहे. एखादे बालक दत्तक न गेल्यास व त्याची वयाची ६ वर्षे पूर्ण झाल्यास त्या बालकास योग्य अशा दुसऱ्या बालगृहात बाल कल्याण समितीच्या आदेशानुसार हस्तांतरित केले जाते.

सर्वप्रथम म्हणजे वर्षाची (एप्रिल २०२२ ते मार्च २०२३) सुरुवात होण्याच्या आधी म्हणजे गतवर्षीच्या शेवटच्या दिवशी ३१ मार्च २०२२ ला शिशु संगोपन गृहात एकूण किती बाळ आणि कोणत्या प्रवर्गातील होते हे चित्र स्पष्ट होणे गरजेचे आहे त्यानंतरच पुढील वर्षातील प्रवेशितांची आकडेवारी स्पष्ट होईल त्यामुळे खालील तक्त्यात ३१ मार्च रोजीची बाळांची स्थिती दर्शविली आहे.

## प्रवेशित बालकांचा तपशील

### (३१ मार्च २०२२ रोजीचा)

| अ. क्र. | प्रवेशाचा प्रवर्ग | मुले | मुली | एकूण |
|---|---|---|---|---|
| १) | परित्यागित | ०४ | ०५ | ०९ |
| २) | सापडलेले | ०३ | ०३ | ०६ |
| ३) | तात्पुरत्या स्वरूपातील निवास | ०१ | ०४ | ०५ |
| | एकूण | ०८ | १२ | २० |

शिशु संगोपन गृहात ३१ मार्च रोजी ३ प्रवर्गात मोडणाऱ्या बालकांचे वास्तव्य होते. त्या रोजी एकूण २० बालके शिशु संगोपन गृहात होती. त्यातील ०९ बालकांना त्यांच्या नैसर्गिक पालकांनी परित्यागीत केले होते, ०६ बालके सापडलेली म्हणजेच पोलिसांमार्फत आलेली होती आणि तात्पुरत्या स्वरूपातील निवासासाठी ०५ बालके होती.

## १ एप्रिल २०२२ ते ३१ मार्च २०२३ मधील प्रवेशित बालकांचा तपशील

| अ.क्र. | प्रवेशाचा प्रवर्ग | मुले | मुली | एकूण |
|---|---|---|---|---|
| १) | ३१ मार्च २०२२ रोजी उपस्थित बालकांची संख्या | ०८ | १२ | २० |
| २) | परित्यागीत | ०२ | ०५ | ०७ |
| ३) | सापडलेले | ०० | ०४ | ०४ |
| | एकूण | १० | २१ | ३१ |

यावरून २०२२-२०२३ वर्षात एकूण ११ पैकी मुले ०२ व मुली ०९ यांचा प्रवेश झाला.

# बालकांसाठी चे उपक्रम

प्रवेशित झालेल्या प्रत्येक बालकाला कुटुंबवत्सल वातावरण उपलब्ध करून द्यावं जेणेकरून त्याचा शिशुगृहातील व दत्तका नंतरचा प्रवास अधिक सुलभ व सुखकर होईल अशी व्यवस्था "साकार" संस्थेत केली जाते.

## वैद्यकीय सुविधा

प्रवेशित झालेल्या तान्हुल्यांची काळजी घेण्यासाठी शिशुगृहात २४ तास आया व परिचारिका कार्यरत असतात. त्याचप्रमाणे प्रत्येक बाळाच्या आरोग्य स्थिती नुसार वैद्यकीय उपचारासाठी, रोज संस्थेमध्ये नियमितपणे बालरोगतज्ञ भेट देतात. प्रत्येक बाळाचे लसीकरण आणि उद्दीपन उपचारही त्यांच्या शारीरिक व मानसिक विकासास गती आणतात.

"साकार" शिशुगृहात, उद्दीपन उपचारासाठी दररोज फ़िजिओथेरेपीस्ट येतात व बालकांच्या वैयक्तिक गरजेनुसार त्यास उत्तेजनात्मक उपचार देण्यात येतात. त्याचप्रमाणे त्यांच्या मानसिक विकासासाठी संस्था प्रयत्नशील असते.

## शैक्षणिक सुविधा

या वर्षी शिशुगृहातील ३ ते ६ वर्ष वयोगटातील ९ बालकांचा पंख या पूर्वप्राथमिक शाळेत प्रवेश घेतला आणि त्यांना शिक्षणाचे दालन खुले करून दिले. कोरोनानंतर प्रथमच खुल्या वातावरणात बालकांना संस्थेबाहेरील शाळेत रोज जाण्याची संधी मिळाल्याने सामाजिक दृष्ट्या ती अधिक मोकळी आणि अनोळखी व्यक्तींशी चटकन समायोजित होतांना आढळली.

## हस्तकला आणि चित्रकला वर्ग

सोमवार ते शुक्रवार शाळा झाल्यावर दुपारच्या वेळात गृहपाठ आणि त्यांच्या बौद्धिक विकासास चालना देण्यासाठी व खेळ घेण्यासाठी साकारच्या ऐच्छिक कार्यकर्त्या संस्थेस नियमित भेट देतात शिवाय शनिवारी व रविवारी एक हस्तकला शिक्षिका त्यांना विविध हस्तकला तसेच चित्रकला शिकवतात.



## श्रीकृष्ण जन्माष्टमी

दिनांक १८ ऑगस्ट २०२२ रोजी साकार संस्थेमध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमी साकारच्या बालगोपाल यांच्या सोबत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. कार्यक्रमप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेल्या श्रीमती मंजुषा राउत संगीत उपचार तज्ञ यांचे स्वागत साकारच्या अध्यक्षांनी केले. पुढे मार्गदर्शनपर बोलताना श्रीमती मंजुषा राउत यांनी श्रीकृष्णाच्या बाल लीलांवर प्रकाश टाकत खूप कथा व गोष्टी सांगितल्या.

सदर कार्यक्रम प्रसंगी श्रीमती राउत यांनी लहान बाळगोपाळ यांना आवडतील असे भाव, भक्ती तसेच रंगतदार गीते गायली तसेच सदर गीतांना लहानग्यांनी उस्फुर्त व आनंदाने प्रतिसाद दिला. त्याचप्रमाणे श्रीमती राउत यांनी कोऱ्या पेपरवर पेन्सिल च्या आधारे गाणी म्हणत असतांना कलात्मक चित्रे गाण्यांच्यानुसार रेखाटण्यास शिकवले.

अशा विविध खेळ आणि गाण्यांच्यानंतर बालगोपालांनी दहीहंडी फोडली तसेच सर्वांनी प्रसाद ग्रहण केला. अशाप्रकारे श्रीकृष्ण जन्माष्टमी कृष्णमय वातावरणात पार पडली. सदर कार्यक्रमास संस्थेचे सर्व बालकवर्ग, कार्यकारी मंडळ सदस्य आणि कर्मचारी वर्ग व सदन माता उपस्थित होत्या.




मुलांसाठी गीत गातांना श्रीमती मंजुषा राउत तसेच
मंचावर संस्थेच्या माजी अध्यक्षा डॉ. सविता पानट
व संस्थेच्या उपाध्यक्ष डॉ. निलीमा पांडे

## आनंदी दिवाळी

दिनांक २० ऑक्टोबर २०२२ रोजी साकार संस्थेमध्ये दिवाळी साजरी करण्यात आली. संस्थेच्या बालगोपाळासोबत दिवाळी साजरी करण्यासाठी श्रीमती अंजली धानोरकर उपजिल्हाधिकारी औरंगाबाद तसेच सुप्रसिद्ध डॉक्टर श्री व्यंकटेश एकबोटे उपस्थित होते त्याचप्रमाणे संस्थेच्या माजी अध्यक्षा डॉ. सविता पानट आणि साकारचे सर्व कार्यकारी सदस्य उपस्थित होते.

सर्वप्रथम मान्यवरांना संस्थेच्या सर्व सदस्यांनी संस्थेचा परिसर दाखवला बाळांची व्यवस्था व स्वच्छता बघून आलेल्या मान्यवरांनी कौतुक केले. त्यानंतर सर्वांनी बाळांच्या सोबत दिवाळी साजरी केली. श्रीमती अंजली धानोरकर यांनी ज्याप्रमाणे दिवाळी मध्ये सर्व जग दिव्याने प्रकाशित होते त्याप्रमाणे संस्थेच्या कार्याने येथील बाळांचे आयुष्य ही प्रकाशित होत आहे असे उद्गार काढले तसेच श्री. डॉ. व्यंकटेश एकबोटे यांनीही संस्थेच्या बाळांच्या भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

मान्यवरांनी आणलेल्या भेटवस्तू तसेच मिठाई सर्वांना देण्यात आली. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व कर्मचार्यांना साकार परिवारातर्फे दिवाळी निमित्त भेट देण्यात आली.



भेटवस्तू देतांना डॉ. व्यंकटेश एकबोटे कमलनयन बजाज रुग्णालय औरंगाबाद

## सहल

दिनांक १८ नोव्हेंबर २०२२ रोजी संस्थेतील २ ते ६ वर्ष वयोगटातील प्रवेशितांची सहल शहरातील सिद्धार्थ उद्यान येथे नेण्यात आली होती. यावेळी बालकांनी उद्यानात विविध खेळ खेळले त्याचबरोबर बालकांना मत्स्यालय आणि प्राणीसंग्रहालय सुद्धा दाखविण्यात आले. विविध प्राण्यांना बघणे हा सर्व बालकांसाठी एक वेगळा अनुभव होता, सदर प्राण्यांबद्दल सोबत असलेल्या कर्मचार्यांनी बालकांना माहिती दिली. मोकळ्या व निसर्गरम्य वातावरणात बागडताना सर्व बालके विशेष आनंदी दिसत होती. शिवाय सोबतच्या रुचकर भोजनाने त्यांचा आनंद अधिकच द्विगुणीत झाला होता.



प्राणी संग्रहालय येथे सर्व बालके व कर्मचारी

### नाताळ उत्सव

दिनांक २४ डिसेंबर २०२२ रोजी "साकार" संस्थेमध्ये नाताळ उत्सव साजरा करण्यात आला. संस्थेचे हितचिंतक व संस्थेला ला नियमित भेट देणारे श्री. श्रीरंग अष्टपुत्रे आणि त्यांचे कुटुंबीय यांनी या दिवशी बालकांचे विशेष मनोरंजन पण केले. श्री. श्रीरंग अष्टपुत्रे हे संस्थेच्या बालकांसाठी "सिक्रेट सांता" बनून आले व यावेळी त्यांनी मुलांशी संवाद साधला. तसेच मुलांना विविध गोष्टी सांगितल्या. मुलांनी त्यांना छान प्रतिसाद दिला. त्यानंतर श्री. अष्टपुत्रे आणि त्यांच्या कुटुंबीयांनी संस्थेतील मुलांसाठी काही भेटवस्तू आणल्या होत्या त्याचे वितरण केले. कार्यक्रमाच्या शेवटी श्री. अष्टपुत्रे यांनी आणलेला केक कापण्यात आला.

## दत्तक प्रक्रिये दरम्यान दिल्या जाणाऱ्या सेवा

संस्थेत प्रवेशित बालक, ज्या वेळेला बाल कल्याण समितीच्या आदेशाने, दत्तक विधानासाठी पात्र ठरते अशा बाळांच्या संदर्भात दत्तक विधान पूर्ण होईपर्यंत दिल्या जाणाऱ्या सेवांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

### बालकांचे दत्तकाद्वारे पुनर्वसन

दत्तकपूर्व, दत्तक दरम्यान आणि दत्तक पश्चात ह्या दत्तक प्रक्रियेच्या प्रामुख्याने तीन अवस्था आहेत. प्रत्येक अवस्थेतील सेवांचे अनन्यसाधारण महत्व आहे कारण त्या परस्परांवर अवलंबून आहेत. उपरोक्त दत्तकावस्थेतील सेवाकार्य खालील प्रमाणे नमूद केले आहे.

संस्थेत प्रवेशित झालेल्या प्रत्येक बालकाचे पुनर्वसन त्यांच्या नैसर्गिक पालकांकडे सुपूर्द करून अथवा दत्तक पालकांकडे सुपूर्द करून केले जाते. २०२२-२०२३ या वर्षात २ बालकांना त्यांच्या नैसर्गिक पालकांकडे सुपूर्द केले तसेच ६ वर्षाआतील १२ बालकांचे कायदेशीर दत्तक विधान पूर्ण केले. आणि ३ मोठ्या (६ वर्षावरील) मुलींचे (ज्यांचा निवास इतर बालगृहात होता) दत्तक विधान पूर्ण झाले.

### दत्तकपूर्व सेवा

- बाळ दत्तक घेण्यास इच्छुक पालकांना सर्व कायदेशीर प्रक्रियेबद्दल पूर्ण माहिती देऊन बाल दत्तक घेण्यापुर्वीचे त्यांचे समुपदेशन करून ऑनलाईन अर्ज भरण्यास ८० पालकांना या वर्षी मार्गदर्शन केले.
- संस्थेच्या कार्यक्षेत्रातील नोंदणी झालेल्या दत्तक इच्छुक पालकांची ३० दिवसांच्या आत गृहभेट घेऊन "कारा" मार्गदर्शक तत्वानुसार २०२२-२३ मध्ये १९ पालकांचा गृह अभ्यास अहवाल तयार करून "कारा" ला सादर करण्यात आला.

### दत्तक बालकांचे कौटुंबिक समायोजन कार्यशाळा

दिनांक १९ एप्रिल २०२२ रोजी औरंगाबाद शहरातील नामवंत मानसोपचार तज्ञ तसेच समुपदेशक श्रीमती मधुरा अन्विकर यांचे दत्तक बालकांचे कौटुंबिक तसेच सामाजिक समायोजन यावर संस्थेच्या च्या कार्यकारी सदस्य मंडळ तसेच कर्मचारी वर्ग यांच्यासाठी एक कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. मोठ्या बालकांची (६ ते १४ वर्षे वयोगटातील) दत्तक प्रक्रिया सुलभ करण्याच्या हेतूने या कार्यशाळेचे आयोजन केले होते त्याचप्रमाणे द्त्तकेच्छुक पालकांची मोठ्या वयाच्या बालकांना स्वीकारतांना कशा प्रकारे पूर्व तयारी करावी याबाबत सखोल ज्ञान कार्यकर्त्यांना व्हावे हा पण या कार्यशाळेचा मानस होता. मोठ्या (६ वर्षावरील) मुलांचे दत्तक कुटुंबात समायोजन हे मुलांसाठी तसेच कुटुंबासाठी कसे सुखकर करता येईल यावर श्रीमती मधुरा अन्विकर यांनी प्रकाश टाकला.

सदर कार्यक्रमास संस्थेच्या अध्यक्षा तसेच सर्व कार्यकारी सदस्य व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी साकारच्या अध्यक्षांनी श्रीमती मधुरा अन्विकर यांचे आभार मानले.




कार्यशाळेत मार्गदर्शन करतांना सौ.मधुरा अन्विकर व उपस्थित "साकार" च्या अध्यक्षा ॲड.अर्चना गोंधळेकर,उपाध्यक्षा डॉ.निलीमा पांडे सचिव सौ.सुचित्रा देशपांडे,कोषाध्यक्षा सौ.राधिका मुळे आणि कार्यकारी सदस्य सौ.गौरी शब्दे

## दत्तक विधान प्रक्रिया सांख्यिकी

| मुले/मुली | दत्तक विधान प्रक्रिया पूर्ण झालेली बालके | | दत्तक विधान प्रक्रिया चालू असलेली बालके | |
|---|---|---|---|---|
| | देशांतर्गत दत्तक विधान | देशाबाहेरील दत्तक विधान | देशांतर्गत दत्तकपूर्व संगोपनात पालकांना सुपूर्द | देशाबाहेरील दत्तक विधान प्रक्रियेत |
| **मुले** | ०२ | ०१ | ०१ | ०० |
| **मुली** | ०७ | ०३ | ०१ | ०० |
| **एकूण** | **१३** | | **०२** | |

- मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे दत्तक याचिका दाखल करण्यापूर्वी दत्तक इच्छुक पालकांची दत्तक समिती सोबत बैठक करून त्यानंतर दत्तक समितीच्या होकारानंतर सर्व औपचारिकता पूर्ण करून बालकाची दत्तक इच्छुक पालकांशी भेट घडवून देण्यात आली. २०२२-२०२३ या वर्षात १५ दत्तक समितीच्या बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या त्यात ० ते ६ वर्षातील १२ बालकांच्या दत्तकासाठी समित्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती.
- दत्तक पूर्व बालसंगोपनाचा करार (Pre Adoption Foster Care Agreement) करून १५ बालकांची कायदेशीर दत्तक विधान याचिका दाखल केली.
- २०२२-२०२३ या वर्षात १३ दत्तक पालकांना दत्तकाचे आदेश सुपूर्द करण्यात आले.

## दत्तक विधान आदेशानंतर च्या सेवा

- १३ पालकांना दत्तक बालकाचे जन्म प्रमाणपत्र मिळवून देण्यात आले.
- बालकांचे देशाबाहेरील दत्तक विधान करतांना मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे ४ बालकांची दत्तक विधान याचिका दाखल करण्यापासून ते बालकांचा पासपोर्ट मिळेपर्यंत ची सर्व प्रक्रिया केली.
- बालकांचे दत्तक पालकांच्या कुटुंबात समायोजन होते आहे की नाही या बाबतचा पाठपुरावा दत्तक विधानानंतर किमान २ वर्ष होणे (दर ६ महिन्याला एक) कायद्याने बंधनकारक असते. या अनुषंगाने या वर्षी संस्थेच्या कार्यक्षेत्रातील १९ दत्तक पालकांची गृहभेट घेऊन बालकांची प्रगती जाणून त्या बाबतचे अहवाल ऑनलाईन भरण्यात आले तसेच संस्थेतील दत्तक गेलेल्या १३ बालकांच्या दत्तक पालकांकडूनही बालकांच्या सामायोजनाबाबत व त्यांच्या वाढ विकासाबाबत पाठपुरावा घेण्यात आला.

# दत्तकाचा प्रचार आणि प्रसार

समाजात दत्तक संकल्पनेबाबतचा प्रचार आणि प्रसार हे "साकार" संस्थेचे निरंतर कार्य आहे. यात दत्तक जाणीव जागृती सप्ताह आणि मान्यवर व संस्थांच्या भेटी याचा अंतर्भाव केला आहे. पुढील काही परिच्छेदात जाणीव जागृती सप्ताह आणि मान्यवरांच्या भेटी याबाबतचा तपशील नोंदविला आहे.

### दत्तक जाणीव जागृती सप्ताह

| | |
|---|---|
| १४/११/२०२२ | प्रसिद्ध समुपदेशक व बाल मानसशास्त्रज्ञ श्रीमती रेणू गावसकर यांच्या उपस्थितीत दत्तक जाणीव जागृती सप्ताहाचे उद्घाटन व "आनंदी पालकत्व" यावर कार्यशाळा. |
| १५/११/२०२२ | बालकांच्या सुद्रढ आरोग्याविषयी शिशु गृहातील सदन मातांशी संवाद. |
| १६/११/२०२२ | कायदेशीर दत्तक प्रक्रियेबद्दल विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांशी संवाद. |
| १७/११/२०२२ | बालगृहातील बालकांसाठी कुटुंब जीवन शिक्षण कार्यक्रम. |
| १८/११/२०२२ | औद्योगिक क्षेत्रातील मान्यवरांसोबत कायदेशीर दत्तक प्रक्रियेबद्दल चर्चासत्र. |
| १९/११/२०२२ | दत्तक जाणीव जागृती सप्ताहात मान्यवरांचा सहभाग. |
| २०/११/२०२२ | दत्तक प्रक्रियेचा प्रचार व प्रसारासाठी मान्यवरांच्या संस्था भेटी. |
| २१/११/२०२२ | दत्तक जाणीव जागृती सप्ताहाचा समारोप. |

दरवर्षी "साकार" संस्था १४ नोव्हेंबर ते २१ नोव्हेंबर दरम्यान दत्तक जाणीव जागृती सप्ताह साजरा करत असते. या वर्षी सप्ताहाच्या प्रथम दिनी म्हणजे १४ नोव्हेंबर २०२२ रोजी "आनंदी पालकत्व" या विषयावर प्रसिद्ध समुपदेशक व बाल मानसशास्त्रज्ञ श्रीमती रेणू गावसकर यांच्या मार्गदर्शनाखाली पालक व शिक्षकांसाठी कार्यशाळा शासकीय अध्यापक महाविद्यालय पदमपुरा औरंगाबाद येथे आयोजित करण्यात आली होती. या सप्ताहाचे उद् घाटन दत्तकाच्या फलकाचे विमोचन करून करण्यात आले.

कार्यशाळेत खालील मुद्द्यांवर श्रीमती रेणुताई गावसकर यांनी मार्गदर्शन केले.

- समृद्धपणे पालकत्व निभवायचे असेल तर पाल्यांच्या क्षमतांना स्वीकारा, म्हणजे पालकत्वाचे ताण नाहीसे होतील. पालकत्व ताणात घालवत असाल तर पाल्यांवर अन्याय कराल.
- बालपणाची संवेदना जपा. बालकात आपली प्रतिकृती शोधू नये, बालक ही सर्वस्वी स्वतंत्र व्यक्ती आहे.
- पाल्यांना शिकवताना निरनिराळे प्रयोग करत रहा, प्रयोगातून मुले प्रभावीपणे शिकतात.
- बाल विकासात, खेळाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यात जीवनाचे धडे बालकांना मिळतात. बालकांना खेळाची संधी उपलब्ध करून द्या.
- पाल्यांना मोबाईल च्या व्यसनाने इतके पोखरले आहे की ती जगाशी संवाद करण्याची कला गमवून बसली आहेत, मोबाईल चा कामापुरता उपयोग आधी पालकांनी करावा व तेच बाळकडू पाल्यांपर्यंत पोहोचवावे.

या कार्यशाळेस दत्तक पालक , शिक्षक वर्ग व "साकार" संस्थेचे पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.





दत्तकाच्या फलकाचे विमोचन करतांना श्रीमती रेणुताई गावसकर, ॲड. अर्चना गोंधळेकर व प्राचार्य डॉ.संजीवनी मुळे

उपस्थित दत्तक पालक व शिक्षक वर्ग

## बालकांच्या सुदृढ आरोग्याविषयी साकार संस्थेतील सदन मातांशी संवाद.

## १५ नोव्हेंबर २०२२

दिनांक १५ नोव्हेंबर २०२२ रोजी बालकांच्या सुदृढ आरोग्य विषयी साकार संस्थेतील आयांसाठी कार्यक्रम घेण्यात आला. यासाठी श्रीमती मनीषा कदम (बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना फुलंब्री जि. औरंगाबाद) या हजर होत्या. यावेळी श्रीमती मनीषा कदम यांनी संस्थेतील आया आणि परिचारिका यांना मार्गदर्शन करताना शिशु गृहातील बालकांच्या विकास व वाढीचा तक्ता तयार करणे, बालकांची उंची तसेच वजन कसे घ्यायला पाहिजे व बालकांच्या वयोमानानुसार किती वजन पाहिजे हे अतिशय चांगल्या प्रकारे समजावून सांगितले व त्याचबरोबर वयानुसार आवश्यक आहाराबद्दल मार्गदर्शन केले.शिवाय मनीषा कदम यांनी आयांना वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनातील नियोजनाचे महत्व सहज व सोप्या भाषेत समजावून सांगितले.




उपस्थितांना मार्गदर्शन करतांना सौ. मनीषा कदम व व्यासपीठावर संस्थेच्या उपाध्यक्षा डॉ. निलीमा पांडे व कार्यकारी सदस्य सौ. गौरी शब्दे

## विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांशी संवाद

## १६ नोव्हेंबर २०२२

दिनांक १६ नोव्हेंबर २०२२ रोजी दत्तक जाणीव जागृती सप्ताह अंतर्गत औरंगाबाद शहरातील नामांकित माणिकचंद पहाडे विधी महाविद्यालय येथील बी. ए. एल. एल. बी.द्वितीय वर्षाचे साधारण ७० विद्यार्थी व तेथील प्राध्यापक वर्ग यांनी साकार संस्थेस भेट दिली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस साकारच्या अध्यक्षा ॲड. अर्चना गोंधळेकर यांनी आलेल्या विद्यार्थी आणि प्राध्यापक वर्ग यांचे स्वागत केले. त्यानंतर प्रा. अपर्णा कोत्तापल्ले यांनी संस्थेला भेट देण्यासाठी परवानगी दिल्याबद्दल आभार मानले. तसेच मुलांना दत्तक विधान आणि बालकासंबंधित कायद्याचे महत्व व माहिती चा भविष्यात नक्कीच फायदा होईल असे सांगितले. सदर भेटीदरम्यान संस्थेच्या अध्यक्षा ॲड. अर्चना गोंधळेकर आणि संस्थेची कायदेशीर बाजू सांभाळणाऱ्या व "साकार" च्या सदस्या ॲड. प्रिया गोंधळेकर यांनी आलेल्या सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

सुरुवातीला ॲड. अर्चना गोंधळेकर यांनी विद्यार्थ्यांना "साकार" संस्थेची माहिती दिली व त्या नंतर दत्तकविधानाची कायदेशीर प्रक्रिया समजावून सांगितली. त्यानंतर ॲड. प्रिया गोंधळेकर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना लैंगिक गुन्ह्यापासून बालकांचे संरक्षण कायदा, बाल अधिनियम कायदा यावर उदाहरणासहित सखोल माहिती दिली व मार्गदर्शन केले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना ॲड. अर्चना गोंधळेकर व ॲड. प्रिया गोंधळेकर यांनी उत्तरे दिली. कार्यक्रमाच्या शेवटी महाविद्यालयातर्फे प्रा. अपर्णा कोत्तापल्ले यांनी साकार संस्थेचे आभार मानले.




माणिकचंद पहाडे विधी महाविद्यालय च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना संस्थेच्या अध्यक्षा ॲड. अर्चना गोंधळेकर सदस्य ॲड. प्रिया गोंधळेकर,महाविद्यालयाच्या प्राध्यापिका अपर्णा कोत्तापल्ले व विद्यार्थी

## बालगृहातील बालकांसाठी कुटुंब जीवन शिक्षण कार्यक्रम.

## १७ नोव्हेंबर २०२२

विद्यादीप बालगृह छावणी औरंगाबाद येथे दिनांक १७ नोव्हेंबर २०२२ रोजी १३ ते १८ वयोगटातील किशोरवयीन मुलींसाठी "क्षितीज" प्रकल्पांतर्गत कुटुंब जीवन शिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. किशोरवयीन मुलींना या वयातील धोके, त्यावर मात करण्याचे मार्ग आणि मूल्यशिक्षण याबाबत संवाद कौशल्याच्या आधारे मार्गदर्शन करण्यात आले.




विद्यादीप बालगृहातील प्रवेशितांना मार्गदर्शन करतांना संस्थेच्या सदस्या सौ. वैशाली अवलगावकर व व्यासपीठावर उपस्थित संस्थेच्या कोषाध्यक्षा सौ.राधिका मुळे व विद्यादीप येथील अधीक्षिका मंगल सिस्टर

## औद्योगिक क्षेत्रातील मान्यवरांसोबत कायदेशीर दत्तक प्रक्रियेबाबत चर्चासत्र

## १८ नोव्हेंबर २०२२

दिनांक १८/११/२०२२ रोजी MAN Energy Solutions India Pvt. Ltd. वाळूज व Johnsons & Johnson Ltd वाळूज औरंगाबाद येथील अधिकारी व कर्मचारी यांचे साकार संस्थेत चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. यावेळी त्यांना कायदेशीर दत्तकाबाबतची सविस्तर माहिती देण्यात आली. तसेच संस्थेतील बालकांच्या प्रवेशापासून ते बालकांचे दत्तक कुटुंबात कायदेशीर दत्तक विधान होईपर्यंतच्या प्रक्रियेत वेळोवेळी झालेले बदल त्यांना विषद केले. शिवाय दत्तकाच्या अनुषंगाने विविध पैलूंवर चर्चा झाली. यावेळेस त्यांनी शिशु गृहास भेट दिली व शिशुगृहातील सुविधांबद्दल समाधान व्यक्त केले. याप्रसंगी उपस्थित अधिकाऱ्यांनी त्यांच्या उद्योग समूहातील कर्मचाऱ्यांना कायदेशीर दत्तक विधानाबाबत जागरूक करण्याचे आश्वासनही दिले त्याचबरोबर शिशुगृहास लागणाऱ्या दैनंदिन गरजेच्या वस्तू भेट म्हणून दिल्या.

## दत्तक जाणीव जागृती सप्ताहात मान्यवरांचा सहभाग

## १९ नोव्हेंबर २०२२

साकार संस्थेसोबत देणगीदार तसेच संस्थेचे हितचिंतक नेहमीच जोडलेले असतात. संस्था दरवर्षी मान्यवर तसेच हितचिंतक यांना आवाहन करते की दत्तक जाणीव जागृती सप्ताहा अंतर्गत शिशु गृहास भेट देऊन सप्ताहात सहभागी होऊन कायदेशीर बाबी समजून घ्याव्या, या आवाहनास मान देऊन संस्थेचे हितचिंतक तसेच देणगीदार यांनी सप्ताहात सहभागी होऊन दत्तक जणीव जागृती सप्ताहाचा उद्देश तसेच महत्व जाणून घेतले आणि दत्तक प्रक्रियेतील बदल समाजातील मान्यवरांपर्यंत पोहचविण्यात आले.

## दत्तक जाणीव जागृती सप्ताहातील प्रचार कार्य

## २० नोव्हेंबर २०२२

दत्तक विधानाबाबत माहितीपर पोस्टर शहरातील सार्वजनिक स्थळांवर लावण्यात आले. आणि दत्तक विधानाचा संदेश जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचविण्यात आला. खाली काही निवडक क्षणचित्रे फोटोंमध्ये उद्धृत केले आहे.



बाल कल्याण समिती औरंगाबाद



जिल्हा बाल संरक्षण अधिकारी कार्यालय औरंगाबाद



मध्यवर्ती बसस्थानक औरंगाबाद

## दत्तक जाणीव जागृती सप्ताहाचा समारोप

## २१ नोव्हेंबर २०२२

दत्तक जाणीव जागृती सप्ताहाचा समारोप समारंभ साकार संस्थेच्या प्रांगणात दिनांक २१ नोव्हेंबर २०२२ रोजी सायंकाळी ५ वाजता आयोजित करण्यात आला होता.

पूर्वी दत्तक जाणीव जागृती साप्ताह साजरा करण्यामागचा हा हेतू होता की समाजातील सर्व स्तरांपर्यंत दत्तकाचा संदेश पोहचवला जावा. त्याचा परिणाम म्हणून आज हा संदेश समाजात सर्वदूर पोहचला असला तरी विशेष बालकांच्या दत्तक ग्रहणाची आज गरज आहे. त्यासाठी हा दत्तक जाणीव जागृती साप्ताह साजरा करण्याची संस्थाना आवश्यकता वाटते. यावर्षी शासनाच्या आदेशाप्रमाणे दत्तकाची माहिती असणारे व प्रचार व प्रसार करणारे फलक/पोस्टर शहरात सार्वजनिक ठिकाणे, आरोग्य केंद्र, पोलीस स्टेशन शासकीय कार्यालये ई. ठिकाणी लावण्यात आले. सदर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमती हर्षा देशमुख (विभागीय उपायुक्त महिला व बाल विकास औरंगाबाद विभाग) लाभल्या होत्या. तसेच श्री. पी. एस. येण्डोले (जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी), श्री. महादेव डोंगरे (जिल्हा बाल संरक्षण अधिकारी) श्री. प्रमोद शिंदे (बालकल्याण समिती सदस्य), प्रा. डॉ. परशुराम शहापूरकर (समाजकार्य महाविद्यालय औरंगाबाद), श्री. बी. एल. राठोड (जिल्हा परीविक्षा अधिकारी औरंगाबाद ), श्री, दीपक बाजारे (बाल संरक्षण अधिकारी औरंगाबाद) ई. मान्यवर उपस्थित होते.

मा. जिल्हा बाल संरक्षण अधिकारी म्हणाले की दरवर्षी दत्तक संस्था दत्तक जाणीव जागृती सप्ताह साजरा करतात आणि तो कसा साजरा करायला हवा त्याबाबत शासन आम्हाला सूचना देत असते आणि त्याच सूचना आम्ही "साकार" संस्थेला दिल्या होत्या व त्याचप्रमाणे साकार ने हा साप्ताह साजरा केलेला आहे दत्तक प्रक्रियेचा प्रसार करण्याचे काम साकार ने दत्तक जाणीव जागृती सप्ताहात चांगल्याप्रकारे केल्यामुळे त्याबाबत मा. जिल्हा बाल संरक्षण अधिकार्यांनी समाधान व्यक्त केले.

मा. विभागीय आयुक्त महिला व बाल विकास विभाग औरंगाबाद विभाग या आपले मनोगत व्यक्त करतांना म्हणाल्या की, दत्तक जाणीव जागृती सप्ताहात दत्तक जन जागृतीची बातमी रोज वर्तमानपत्रात यायला हवी, अजूनही मुल दत्तक न घेता नात्यातील मुल घेण्याची समाजाची मानसिकता आहे ती बदलायला हवी आणि ही मानसिकता बदलण्याची जबाबदारी शासन व विशेष दत्तक संस्थांनी एकत्रितपणे घ्यायला हवी.

अध्यक्षीय समारोप प्रसंगी ॲड. अर्चना गोंधळेकर यांनी दत्तक जाणीव जागृती सप्ताहात साजऱ्या करण्यात आलेल्या कार्यक्रमा बद्दल थोडक्यात माहिती दिली आणि संस्थेने मोठ्या मुलांचे दत्तक विधान यशस्वीरीत्या पार पाडल्याचा उल्लेख केला.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन संस्थेच्या सदस्य सौ.नीलिमा देशपांडे यांनी केले तर प्रास्ताविक संस्थेच्या कार्यकारी सदस्य श्रीमती वैशाली अवलगावकर यांनी केले व उपस्थितांचे तसेच इतरांचे आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता झाली.




सूत्रसंचालन करतांना संस्थेच्या च्या सदस्या सौ. वैशाली अवलगावकर




व्यासपीठावरील प्रमुख पाहुण्या सौ. हर्षा देशमुख संस्थेच्या च्या अध्यक्षा ॲड. अर्चना गोंधळेकर, जि.म.बा. विकास अधिकारी श्री. प्रमोद यंडोले, जि.बा.सं. अधिकारी श्री.महादेव डोंगरे,श्री.प्रदीप शिंदे (सदस्य बाल कल्याण समिती), श्री.परशुराम शहापूरकर (समाजकार्य महाविद्यालय औरंगाबाद)

# सदन मातांसाठीचे उपक्रम

साकार संस्थेच्या कार्याची गुणवत्ता राखणारा प्रमुख घटक आया, "सदन माता" आहेत त्यामुळे त्यांच्यातील क्षमता विकास होण्यासाठी विविध कार्यशाळा तसेच कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते त्याचा तपशील पुढील प्रमाणे

## माहितीपर सत्र

## HIV या आजाराविषयी माहिती व मार्गदर्शन

दिनांक ०९ मे २०२२ रोजी दुपारी 3 वाजता साकार संस्थेत HIV या आजाराविषयी माहिती व मार्गदर्शना साठी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता यासाठी वैद्यकीय रुग्णालय व महाविद्यालय औरंगाबाद येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ता (ART समुपदेशक) श्री. संजय पवार यांना आमंत्रित केले होते.

सदर कार्यक्रमाच्या प्रारंभी संस्थेच्या च्या अध्यक्षांनी श्री. संजय पवार यांचे स्वागत केले. श्री. पवार हे मागील 20 वर्षांपासून शासकीय वैद्यकीय रुग्णालयात HIV या आजारावर मार्गदर्शन तसेच या आजाराबाबत असलेले समज गैरसमज दूर करण्यासाठी सातत्याने कार्य करत आहेत. त्यांनी साकार संस्थेतील आया व कर्मचाऱ्यांना पुढीलप्रमाणे मार्गदर्शन केले.

HIV हा आजार समजून घेतल्यास त्या विषयीचे चुकीचे समज दूर होतात. हा संसर्ग होण्याची तीन प्रमुख कारणे 1) असुरक्षित शारीरिक संबंध. २) शस्त्रक्रियेदरम्यान होणाऱ्या दुर्लक्षामुळे. 3) तपासणी किवा लसीकरणा दरम्यान वापरल्या जाणाऱ्या असुरक्षित सुई (Injection) मुळे. ह्या तीन घटकांमुळे HIV होण्याचे प्रमाण जास्त असते. सदर बाबींबाबत काळजी घेतल्यास हा आजार होण्याचे प्रमाण अगदी कमी होऊ शकते.

यानंतर प्रश्नोत्तराच्या सत्रात त्यांनी माता HIV positive असल्यास तिने जन्माला घातलेल्या बाळाला संसर्ग झालेला असला तरी योग्य उपचाराने बाळ पहिल्या १८ महिन्यात निरोगी होऊ शकते असे सांगितले. या कार्यक्रमात आयांच्या HIV बद्दलच्या सर्व गैरसमजूतीचे निरसन करण्यात आले.




श्री संजय पवार यांच्या समवेत साकारच्या अध्यक्षा ॲड. अर्चना गोंधळेकर

तसेच डॉ. निलीमा पांडे,श्रीमती राधिका मुळे, श्रीमती गौरी शब्दे व "साकार"चे कर्मचारी

## सिकल सेल ॲनिमिया या आजाराविषयी माहिती व मार्गदर्शन

दिनांक ०२ जून २०२२ रोजी साकार संस्थेमध्ये "सिकल सेल ॲनिमिया" या दुर्मिळ आजाराविषयी श्रीमती डॉ. मंजुषा कुलकर्णी यांचे माहिती व मार्गदर्शनपर सत्र आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस श्रीमती मंजुषा कुलकर्णी यांचे स्वागत "साकार" संस्थेच्या अध्यक्षाच्या हस्ते करण्यात आले. श्रीमती मंजुषा कुलकर्णी या MD Pathology असून मागील २९ वर्षांपासून त्या दत्ताजी भाले रक्तपेढी चालवत आहेत. त्यांचा रक्त व त्यासंबंधी असणाऱ्या आजारांबद्दल पूर्ण सखोल अभ्यास आहे.

सिकल सेल ॲनिमिया हा आनुवंशिक आजार आहे. आपल्या रक्तातील हिमोग्लोबिन चे प्रमाण वारंवार कमी होत आल्यास या आजाराचे ते लक्षण असू शकते. सदर आजार झाल्यास रक्तातील हिमोग्लोबिन मधील प्रोटीन कमी होते तसेच ऑक्सिजन लाल रक्तपेशी पर्यंत पोहचवण्याचे कार्य बिघडते तसेच शरीरातील कार्बन डायऑक्साईड फुफुसांद्वारे बाहेर टाकण्याची प्रक्रिया कमी होत जाते आणि परिणामी रुग्णाचे वजन कमी होते. रक्तातील लाल पेशी तयार होण्याचे काम थांबणे आणि त्यामुळे रुग्णाची प्रतिकारशक्ती कमी होण्याचे प्रमाण वाढत जाते.

सदर आजारावर उपचार घेऊन झाले तरीही काही कालावधी नंतर सदर आजार पुन्हा होऊ शकतो. आजाराचे प्रमाण कमी असलेल्या १०० टक्के लोकांपैकी २० टक्के लोक सुस्थितीत होण्याची शक्यता असते. सदर आजारासाठी सरकारी रुग्णालयात किमोथेरपी, रेडीएशन थेरपी व औषधी या सारख्या सुविधा काही योजने अंतर्गत समाविष्ट आहेत.आजार गंभीर स्वरुपाचा होत गेल्यास त्यावर Bone Marrow Transplant हा अंतरिम उपचार केला जातो यामध्ये कुटुंबातील आजार झालेल्या व्यक्तीस त्याच्या कुटुंबातील दुसरा सदस्य मूळ पेशी उपचारासाठी दान करू शकतो.

कार्यक्रमाच्या शेवटी साकारच्या उपाअध्यक्षांनी श्रीमती मंजुषा कुलकर्णी यांचे आभार मानले. सदर कार्यक्रमास "साकार"चे कार्यकारी सदस्य तसेच कर्मचारी उपस्थित होते.




उपस्थितांना मार्गदर्शन करतांना डॉ.मंजुषा कुलकर्णी

## बाळांची काळजी व संगोपन प्रशिक्षण शिबीर

दिनांक १० ऑक्टोबर २०२२ ते १४ ऑक्टोबर २०२२ आणि दिनांक २७ ऑक्टोबर २०२२ ते ३१ ऑक्टोबर २०२२ या दोन सप्ताहात "साकार" संस्थेमध्ये, बाळांची काळजी व संगोपन या विषयावर आयांसाठी ऑनलाईन ट्रेनिंग आयोजित करण्यात आले होते. सदर प्रशिक्षणाच्या प्रमुख मार्गदर्शक म्हणून आय प्रोग्रेस फाउंडेशन च्या सहसचिव श्रीमती अर्चना जोशी होत्या.

दोन्ही सत्रांच्या दरम्यान संस्थेच्या सर्व आया आणि कर्मचारी व कार्यकारी सदस्य ऑनलाईन उपस्थित होते. सर्वांना मार्गदर्शन करताना श्रीमती अर्चना जोशी यांनी ०-५ महिने वयाच्या बालकांच्या विकासाबाबत पुढीलप्रमाणे आवश्यक बाबी कथन केल्या.

१) बाळांसोबत यांत्रिक नाते न ठेवता त्याच्यासोबत भावनिक नाते ठेवावे त्यामुळे बाळाची प्रगती योग्य दिशेने होण्यास मदत होते.

२) बाळांसाठी आपण त्यांची आई आहोत, अशी वृत्ती असायला हवी. कारण आया जरी पगारी कामावर असल्या तरी सदर बाळास याचे भान नसल्याने बाळ त्यांना आईच्या रुपात च बघत असते त्यामुळे काम करणाऱ्या आयांनी ही गोष्ट लक्षात ठेवणे गरजेचे आहे.

३) ० ते १० महिन्याच्या बाळा बाबत खूप काळजी घेणे गरजेचे असते त्यासाठी आपण आयांनी खूप जागरूक असणे गरजेचे आहे दीड ते दोन महिन्यात बाळास दृष्टी आपल्या हालचाली प्रमाणे वळवता येते.अशा प्रसंगी बाळाशी संवाद साधणे गरजेचे आहे.

४) बाळाची काळजी घेतांना आपल्या असलेल्या पाच ज्ञानेंद्रियांचा विकास होणे गरजेचे असते १) कान २) नाक ३) डोळे ४) स्पर्श ५) वास याबद्दल श्रीमती अर्चना जोशी यांनी आयांना मार्गदर्शन केले.

५) मतीमंद व अपंग मुलांच्या बाबतीत विशेष काळजी घेणे अगदी पाळण्यातल्या बाळा प्रमाणे घ्यावी कारण त्यांचात चालण्या बोलण्याचा अभाव असतो. त्यानुसार त्यांचावर निरीक्षण ठेऊन त्यांची सेवा आपण केली पाहिजे. त्यांना शक्य तितके खेळवणे, इतर मुलांसोबत रमवणे, शैक्षणिक खेळणी देऊन ज्ञानरूपी उत्तेजन देणे. मतीमंद मुलांच्या बाबतीत सु व शी बाबत काळजी घेणे आवश्यक आहे.

प्रशिक्षण दरम्यान श्रीमती जोशी यांनी सर्व कर्मचाऱ्यांशी संवाद साधला आणि त्यांच्या प्रश्नांची उत्तरे दिली. त्याचप्रमाणे विविध क्रियाकलाप द्वारे मार्गदर्शन केले. सत्राच्या शेवटी संस्थेच्या उपाध्यक्ष डॉ. निलीमा पांडे व सचिव सुचित्रा देशपांडे यांनी श्रीमती जोशी यांचे आभार मानले.



प्रशिक्षणात मार्गदर्शन करतांना सौ. अर्चना जोशी

# उत्तेजन,आरोग्य,मनोरंजन आणि विविध गुणदर्शन कार्यक्रम

## मातृ दिन

दिनांक ८ मे २०२२ रोजी साकार संस्थेमध्ये "मातृ दिन" उत्साहात साजरा करण्यात आला. मातृदिनाच्या कार्यक्रमासाठी "साकार" चे सर्व कार्यकारी सदस्य व सर्व कर्मचारी वर्ग उपस्थित होते. संस्थेच्या च्या अध्यक्षांनी सर्व आयांना मातृ दिनाचे महत्व सांगितले तसेच बाळांना आई ची माया देणाऱ्या आया व इतर कर्मचार्यांचे आभार मानले.

मातृदिनाचे औचित्य साधून साकारच्या अध्यक्षा तसेच सर्व कार्यकारी सदस्य मंडळातर्फे सर्व आया व इतर कर्मचाऱ्यांसाठी प्रितीभोजन आयोजित केले होते. त्यानंतर साकारच्या कार्यकारी सदस्यांतर्फे सर्व आया तसेच कर्मचार्यांना मातृदिनानिमित्त खास भेट वस्तू देण्यात आली.




मातृदिनानिमित्त साकारच्या सदन माता व  साकार कार्यकारी सदस्य मंडळ

## जागतिक योग दिन

दिनांक २१ जून २०२२ रोजी साकार संस्थेमध्ये जागतिक योग दिनानिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. नीलिमा गाजरे (होमिओ क्लिनिक तसेच न्युट्रीशन तज्ञ) उपस्थित होत्या. डॉ. नीलिमा यांचे स्वागत साकार संस्थेच्या कोषाध्यक्षांनी केले तसेच कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीमती गौरी शब्दे, कार्यकारी सदस्य यांनी केले.

२१ जून हा दिवस "योग दिन" म्हणून का पाळला जातो याबाबत माहिती डॉ. गाजरे यांनी आयांना दिली. यावर्षीच्या योग थीम बद्दल बोलताना त्यांनी सांगितले की या वर्षी "करे योग रहे निरोग" याप्रमाणे योग ही आज काळाची गरज झालेली आहे आणि पूर्ण भारतवर्ष संपूर्ण जगाला योग दिनाचे महत्व पटवून देत असताना आपण गाफील राहून चालणार नाही अशाप्रकारे डॉ. गाजरे यांनी योग दिनाचे महत्व पटवून दिले.

त्यानंतर त्यांनी दैनंदिन जीवनात योग करण्यासाठी ची काही प्रात्यक्षिके करून दाखवली आणि समोर उपस्थित असलेले "साकार" चे कार्यकारी सदस्य मंडळ आणि कर्मचारी वर्ग यांनी त्याचे अनुकरण केले आणि याचबरोबर त्यांनी रोज योग साधना करण्यासाठी किमान दहा मिनिटांचा वेळ स्वतःसाठी काढणे आवश्यक आहे असे सांगितले.

कार्यक्रमाच्या शेवटी साकार संस्थेच्या कार्यकारी सदस्यांनी प्रमुख पाहुण्यांचे आभार मानले व कार्यक्रमाची सांगता झाली.



जागतिक योग दिनानिमित्त मार्गदर्शन करतांना डॉ. निलीमा गाजरे. व्यासपीठावर साकारच्या कार्यकारी सदस्य सौ. आशा नानीवडेकर व सौ. गौरी शब्दे

## सदन माता व कर्मचाऱ्यांची सहल

"साकार" च्या बालकांसाठी अविरतपणे काम करणाऱ्या आयांची सहल दिनांक १२/०२/२०२३ रोजी शेगाव या धार्मिक स्थळी नेण्यात आली. सदर सहलीदरम्यान सर्व आया तसेच कर्मचाऱ्यांनी धमाल केली.



सहलीदरम्यान भोजनाचा आस्वाद घेतांना संस्थेच्या आया व कर्मचारी

## महिला दिन २०२३

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने साकार संस्थेच्या प्रागंणात, अतिशय आनंददायी वातावरणात निराधार बालकांचे संगोपन करणाऱ्या आयांनी, त्यांच्यातील कला गुणांचे सादरीकरण केले . या कार्यक्रमात सर्व आयांनी नारीशक्तीची महती सांगणारे काव्य तसेच नृत्य सादर केले. या प्रसंगी प्रशासकीय सेवापूर्व प्रशिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ पंकजा वाघमारे प्रमुख पाहुण्या म्हणून लाभल्या होत्या.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या डॉ. वाघमारे यांनी स्त्री मुक्तीचा इतिहास सांगत नमूद केले कि, मागील १०००-१२०० वर्षात झालेल्या परकीय आक्रमणानंतर घरातील स्त्रियांचे संरक्षण करण्यासाठी त्यांना घरात डांबून ठेवले गेले पण तत्पूर्वी भारतीय स्त्रीला पुरुषांच्या बरोबरीने सर्वच क्षेत्रात महत्त्व होते आणि शिक्षण घेण्यात हि स्त्रिया कुठेही मागे नव्हत्या. आपली भारतीय संस्कृती ज्ञानाने, विचाराने आणि कर्तुत्वाने अतिशय उदात्त आणि भव्यही होती. त्यांनी विशेष नमूद केले की, "साकार" संस्थेत आज खऱ्या यशोदांना भेटून त्यांना खूपच आनंद झाला आणि आयांच्या योगदानाचे त्यांनी भरभरून कौतुक केले . तसेच सर्व आयांचा सन्मान साकार अध्यक्षा, संस्थापक सदस्य डॉ. सविता पानट आणि डॉ. वाघमारे यांच्या हस्ते करण्यात आला.




महिला दिनानिमित्त मान्यवरांच्या हस्ते भेट स्वीकारतांना संस्थेच्या आया

# संस्थेस मान्यवरांच्या भेटी

## औरंगाबाद इलेक्ट्रिकल्स लिमिटेड

दिनांक ३० सप्टेंबर २०२२ रोजी औरंगाबाद शहरातील तसेच परिसरातील नामांकित कंपनी औरंगाबाद इलेक्ट्रिकल्स लिमिटेड येथील मानव संसाधन विभाग व्यवस्थापक श्री. लालबिहारी मिश्रा तसेच प्रशांत शर्मा आणि रवींद्र पितळे यांनी साकार संस्थेस भेट दिली. सदर भेटीदरम्यान साकारच्या अध्यक्षा, कोषाध्यक्ष आणि कार्यकारी सदस्य उपस्थित होते.

सर्व पाहुण्यांना कार्यकारी सदस्य श्री. सुहास वैद्य यांनी "साकार" बद्दल माहिती सांगितली तसेच साकार संस्थेच्या बाहेर असलेल्या पाळण्यासंधर्भात माहिती दिली. त्यानंतर संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती अर्चना गोंधळेकर यांनी साकार संस्थेची कार्यप्रणाली तसेच दत्तक विधान याबाबत उपस्थितांना संपूर्ण माहिती दिली. सर्व माहिती जाणून घेतल्यानंतर आलेल्या पाहुण्यांनी संस्थेचे तसेच संस्थेसाठी काम करणाऱ्या सर्वांचे कौतुक केले व आभारही मानले.



औरंगाबाद इलेक्ट्रिकल्स लिमिटेड चे पदाधिकारी व "साकार" संस्थेच्या
कोषाध्यक्ष सौ.राधिका मुळे व कार्यकारी सदस्य श्री.सुहास वैद्य

## प्रसिद्ध लेखक "श्री. गिरीश कुबेर" यांची साकार संस्थेस भेट.

दिनांक १२ नोव्हेंबर २०२२ रोजी लोकसत्ता या वर्तमानपत्राचे व्यवस्थापकीय संचालक तसेच प्रसिद्ध लेखक श्री. गिरीश कुबेर यांनी साकार संस्थेस भेट दिली. सदर भेटीदरम्यान संस्थेच्या अध्यक्षा तसेच संस्थेच्या आधारस्तंभ डॉ. सविता पानट आणि सर्व कार्यकारी मंडळ सदस्य उपस्थित होते.

संस्थेचे कार्य बघून श्री. कुबेर म्हणाले "रवींद्रनाथ टागोर यांनी एका ठिकाणी लिहिले आहे Every child comes with God's message that he is yet not disappointed "साकार" ला भेट दिल्यानंतर या वचनाची सत्यता पटते. एका अप्रसन्न कृतीची प्रसन्न सांगता करण्याची क्षमता या संस्थेत आहे. या संस्थेस आवश्यक त्या सर्व सहाय्याचे आश्वासन व सदिच्छा"





प्रसिद्ध लेखक श्री. गिरीश कुबेर यांच्यासमवेत "साकार" संस्थेच्या अध्यक्षा ॲड.अर्चना गोंधळेकर,

आधारस्थंभ सौ.सविता पानट,कार्यकारी सदस्य व कर्मचारी

### लायन्स क्लब ब्राझील

दिनांक ५ जानेवारी २०२३ रोजी लायन्स क्लब ब्राझील येथील पदाधिकारी तसेच सदस्यांनी भारत दौऱ्यावर असतांना, "साकार" संस्थेची भेट घेतली. सदर भेटीदरम्यान लायन्स क्लब च्या सदस्यांना "साकार" संस्थेच्या उपाध्यक्षा यांनी संस्थेचा इतिहास, संस्थेची कार्यप्रणाली, संस्थेची उद्दिष्टे व संस्थेतर्फे दिल्या जाणाऱ्या सेवा व इतर समाजोपयोगी कार्यक्रमांची माहिती दिली.

संस्थेचे कार्य व संस्था बघून आलेले सर्व सदस्य भारावून गेले तसेच त्यांनी संस्थेच्या कामाचे कौतुक केले व पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.




भेटी दरम्यान लायन्स क्लब ब्राझील चे पदाधिकारी व संस्थेच्या उपाध्यक्षा डॉ.निलीमा पांडे

## शैक्षणिक संस्थांच्या "साकार" संस्थेस भेटी

दर वर्षी विविध शैक्षणिक संस्थांचे विद्यार्थी आणि त्यांचे गुरुजन "साकार" संस्थेस विशिष्ट हेतूने भेटी देत असतात याअर्थी शैक्षणिक संस्थांची गरजांपूर्तीचे कार्य थोडक्यात विद्यादानाचे, प्रशिक्षणाचे, तरुणाईवर सेवाकार्याच्या संस्काराचे अथवा बाल विद्यार्थ्यांवर समाजभान रुजविण्याचे कार्य संस्था पार पाडीत असते.

यावर्षी सर्व स्तरातील शिक्षण घेत असलेल्या (पूर्वप्राथमिक ते पदव्युत्तर) विद्यार्थी आणि शिक्षकांनी संस्थेस भेट दिली. भेट देणाऱ्या शैक्षणिक संस्थांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

### शैक्षणिक भेटी

| अ. क्र. | दिनांक | भेट देणाऱ्या महाविद्यालयाचे/शाळेचे नाव | उपस्थित संख्या |
|---|---|---|---|
| १ | १०/०८/२०२२ | समाजकार्य महाविद्यालय डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद | २८ |
| २ | १६/११/२०२२ | माणिकचंद पहाडे विधी महाविद्यालय औरंगाबाद | ७० |
| ३ | १९/११/२०२२ | जवाहरलाल नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालय औरंगाबाद | १५ |
| ४ | १०/०२/२०२३ | नाथ व्हॅली शाळा औरंगाबाद | १४४ |
| ५ | २०/०३/२०२३ | Tiny Tots School औरंगाबाद | ४८ |
| ६ | २१/०३/२०२३ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजकार्य महाविद्यालय वर्धा | ५० |

समाजकार्याचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना संस्थेच्या स्थापनेपासून ते संस्थेच्या कार्याचा पूर्ण तपशील जाणायचा असतो, त्याचप्रमाणे लाभार्थी, सेवांचे स्वरूप, संस्थेचे कर्मचारी, आर्थिक बाजू, व्यवस्थापन याबाबत सविस्तर माहिती सांगितली जाते.

विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी दत्तकाची कायदेशीर प्रक्रिया त्यांच्या भेटीत समजून घेतली, त्याचप्रमाणे यावेळी बाल अधिनियम कायदा आणि बाल लैंगिक शोषण विरोधी कायद्याविषयी पण प्रश्नोत्तराद्वारे चर्चा झाली.

शाळेतील विद्यार्थ्यांना संस्थागत बालक त्यांचे प्रश्न व त्याचे निराकरण आणि त्यांचासाठी उपलब्ध सेवा जाणून घेण्यात विशेष रूची होतीच शिवाय या सेवा कार्यात त्यांचा खारीचा वाटा त्यांनी देऊ केला. पूर्व प्राथमिक गटाने तर "Joy of Giving" देण्यातला आनंद अनुभवला, "sharing" चा संस्कार बाल मनावर होण्यासाठीच या शाळेने हि संस्था भेट आयोजित केली होती.

## शासकीय अधिकाऱ्यांच्या संस्था तपासणी भेटी

| अ.क्र. | दिनांक | भेट देणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव, पद व विभाग |
|---|---|---|
| १ | २३/०५/२०२२ | १) जिल्हा महिला बाल विकास अधिकारी औरंगाबाद<br>२) श्री. महादेव डोंगरे जिल्हा बाल संरक्षण अधिकारी औरंगाबाद<br>३) श्री. विजय विघ्ने परीविक्षा अधिकारी जिल्हा महिला बाल विकास अधिकारी कार्यालय औरंगाबाद |
| २ | ०१/०६/२०२२ | १) श्री. बी. एल. राठोड परीविक्षा अधिकारी जिल्हा महिला बाल विकास अधिकारी कार्यालय औरंगाबाद<br>२) श्री. महादेव डोंगरे जिल्हा बाल संरक्षण अधिकारी औरंगाबाद<br>३) सौ. कल्पना मोहिते बाल संरक्षण अधिकारी जिल्हा महिला बाल विकास अधिकारी कार्यालय औरंगाबाद<br>४) दीपक बाजारे PONIC बाल संरक्षण अधिकारी औरंगाबाद |
| ३ | १२/०८/२०२२ | १) श्री. विजय विघ्ने परीविक्षा अधिकारी जिल्हा महिला बाल विकास अधिकारी कार्यालय औरंगाबाद<br>२) श्री. महादेव डोंगरे जिल्हा बाल संरक्षण अधिकारी औरंगाबाद<br>३) दीपक बाजारे PONIC बाल संरक्षण अधिकारी औरंगाबाद |
| ४ | २२/०९/२०२२ | १) सौ. संगीता सानप उपजिल्हाधिकारी औरंगाबाद<br>२) डॉ. एन. बी. शहा सदस्य JJB औरंगाबाद<br>३) श्री. बी. एल. राठोड परीविक्षा अधिकारी जिल्हा महिला बाल विकास अधिकारी कार्यालय औरंगाबाद<br>४) श्री. विजय विघ्ने परीविक्षा अधिकारी जिल्हा महिला बाल विकास अधिकारी कार्यालय औरंगाबाद<br>५) श्री. प्रदीप शिंदे सदस्य बाल कल्याण समिती औरंगाबाद |
| ५ | ०४/१०/२०२२ | १) ॲड. आशा शेरखाने अध्यक्ष बाल कल्याण समिती औरंगाबाद<br>२) विजय देशमुख सदस्य बाल कल्याण समिती औरंगाबाद<br>३) श्री. प्रदीप शिंदे सदस्य बाल कल्याण समिती औरंगाबाद<br>४) गजानन सूर्यवंशी सदस्य बाल कल्याण समिती औरंगाबाद |
| ६ | ०७/१०/२०२२ | १) श्री. महादेव डोंगरे जिल्हा बाल संरक्षण अधिकारी औरंगाबाद<br>२) दीपक बाजारे PONIC बाल संरक्षण अधिकारी औरंगाबाद<br>३) सौ. कल्पना मोहिते बाल संरक्षण अधिकारी जिल्हा महिला बाल विकास अधिकारी कार्यालय औरंगाबाद |

| | | |
|---|---|---|
| ७ | १६/१०/२०२२ | १) ॲड. आशा शेरखाने अध्यक्ष बाल कल्याण समिती औरंगाबाद<br>२) गजानन सूर्यवंशी सदस्य बाल कल्याण समिती औरंगाबाद |
| ८ | ११/०१/२०२३ | १) सौ. वर्षा वाघचौरे सदस्य बाल कल्याण समिती औरंगाबाद<br>२) श्री. प्रदीप शिंदे सदस्य बाल कल्याण समिती औरंगाबाद |
| ९ | ०१/०२/२०२३ | १) ॲड. आशा शेरखाने अध्यक्ष बाल कल्याण समिती औरंगाबाद<br>२) सौ. वर्षा वाघचौरे सदस्य बाल कल्याण समिती औरंगाबाद<br>३) श्री. प्रदीप शिंदे सदस्य बाल कल्याण समिती औरंगाबाद |

## सामाजिक दायित्व (CSR) अंतर्गत साकार संस्थेस सहाय्य

### औरंगाबाद इलेक्ट्रिकल्स लिमिटेड

औरंगाबाद इलेक्ट्रिकल्स लिमिटेड या शहरातील तसेच देशातील नामांकित कंपनीने CSR अंतर्गत साकार संस्थेस २०२२-२३ या आर्थिक वर्षासाठी निधी मंजूर केला. सदरचा निधी हा बालकांसाठी व त्यांच्या पुनर्वसनासाठी देण्यात आला.




CSR अंतर्गत श्री. पितळे यांनी साकार संस्थेस भेट दिली सोबत साकारच्या अध्यक्षा ॲड. अर्चना गोंधळेकर

### मॅन एनर्जी सोल्यूशन्स लिमिटेड

औरंगाबाद शहरातील वाळूज MIDC मधील MAN Energy Solutions Ltd. या उर्जेसंबंधित अग्रगण्य उद्योग समूहाने साकार संस्थेला CSR अंतर्गत वर्ष २०२२-२३ साठी मदत केली. सदर मंजुरी देताना MAN Energy Solutions Ltd. च्या पदाधिकार्यांनी संस्थेस भेट देऊन संस्थेचे कार्य तसेच इतर गोष्टी जाणून घेतल्या. हे आर्थिक सहकार्य साकार संस्थेच्या कर्मचाऱ्यांच्या मानधनासाठी करण्यात आले.




मॅन एनर्जी सोलुशन्स लिमिटेड चे पदाधिकारी समवेत साकारच्या सचिव सौ.सुचित्रा देशपांडे व कार्यकारी सदस्य सौ.माधुरी शब्दे

### भारतीय स्टेट बँक

दिनांक 20 जानेवारी २०२३ रोजी देशातील तसेच जगातील सर्वात मोठी बँक असलेली भारतीय स्टेट बँक यांनी "साकार" संस्थेस सामाजिक दायित्व अंतर्गत "युटीलिटी व्हॅन" बँकेचे मुख्य महाव्यवस्थापक महाराष्ट्र मंडल श्री. अरविंद कुमार सिंह यांच्या हस्ते देण्यात आली. याप्रसंगी संस्थेच्या कार्याचे कौतुक करतांना "साकार" ला भविष्यातही मदत करण्याचे आश्वासन दिले.




सामाजिक दायित्व अंतर्गत "युटीलिटी व्हॅन" स्वीकारतांना "साकार" च्या उपाध्यक्षा डॉ.निलीमा पांडे,
कोषाध्यक्षा सौ.राधिका मुळे व कार्यकारी सदस्य सौ.वैशाली अवलगावकर

## विविध समाजोपयोगी उपक्रम

### सक्षम बाल विवाह निर्मुलन जनजागरण

"साकार" संस्थेने या वर्षी बाल विवाह निर्मुलनासाठी UNICEF तसेच SBC3 मुंबई यांच्या सोबत "सक्षम" नावाचा प्रकल्प दिनांक १७ ऑगस्ट २०२२ ते २५ ऑक्टोबर २०२२ दरम्यान औरंगाबाद जिल्ह्यातील १२५ जिल्हा परिषद शाळेतील इयत्ता ६ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी तसेच त्यांच्या पालकांसाठी राबवला. या प्रकल्पादरम्यान २३ स्वयंसेवकांच्या मदतीने साकार संस्थेने विद्यार्थ्यांसाठी तसेच त्यांच्या पालकांसाठी ३५४ सत्र घेतले ज्यातून बालविवाहाचे मुलींवर होणारे दुष्परिणाम, बालविवाहामुळे भविष्यात होणारे शारीरिक तसेच मानसिक नुकसान, बालविवाहाच्या कायदेशीर बाजू व शिक्षणाचे महत्व यावर खेळ, गोष्टी व गाणी याद्वारे प्रकाश टाकला. सदर प्रकल्पातून १८,६४१ विद्यार्थी व ३५०० पालकांपर्यंत पोहचून त्यांना या विषयावर जागृत करण्यात आले. हे सर्व ज्या स्वयंसेवकांनी केले त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे सामाजिक कार्य महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या प्रमाणात होते त्याचबरोबर सोयगाव जि. औरंगाबाद येथील स्व. बाबूरावजी काळे या शिक्षणसंस्थेच्या शिक्षिकांनी ही सहकार्य केले. सक्षम प्रकल्पात स्वयंसेवक म्हणून काम करणाऱ्या स्वयंसेविकांना दत्तक जाणीव जागृती सप्ताहाच्या समारोप प्रसंगी उपायुक्त श्रीमती हर्षा देशमुख महिला व बाल विकास औरंगाबाद विभाग यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले. याप्रसंगी श्रीमती हर्षा देशमुख यांनी असे नमूद केले की, बाल विवाह या प्रथेला प्रतिबंध घालण्याची नितांत गरज आहे. कोरोना काळात मोठ्या प्रमाणावर बाल विवाह झालेले आहे व त्याचे अनिष्ट परिणाम मुलींवर होत आहेत. "साकार" संस्थेने सक्षम या प्रकल्पाच्या माध्यमातून बाल विवाह प्रतिबंधात खारीचा वाटा उचलला आहे. अध्यक्षीय समारोप प्रसंगी, ॲड. अर्चना गोंधळेकर यांनी सक्षम प्रकल्प पार पाडतांना साकार संस्थेला आलेल्या अडचणी व प्रतिक्रिया या बाबत माहिती दिली तसेच हा प्रकल्प यशस्वीरीत्या राबविला म्हणून समाधान व्यक्त करून समाजकार्य महाविद्यालय तसेच स्वयंसेवकांचे आभार मानले.



सक्षम कार्यक्रमांतर्गत मार्गदर्शन करतांना स्वयंसेवक

## थोडसं बोलूया !!!!!

दिनांक ३० सप्टेंबर २०२२ रोजी शहरातील जवाहरलाल नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालय येथे संस्थेच्या अनेक प्रकल्पांपैकी एक थोडसं बोलूया!! हा कार्यक्रम अभियंता अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आला.राष्ट्रीय सेवा योजना प्रकल्पाअंतर्गत महाविद्यालयातर्फे प्रा. शिंदे सर तसेच प्रा. खाके सर यांनी सर्वप्रथम मान्यवरांचे स्वागत केले. सदर कार्यक्रमास संस्थेच्या उपाध्यक्षा, कोषाध्यक्षा, संस्थेचे कार्यकारी सदस्य व स्वयंसेवक यांनी मुलांना तारुण्यातील संवेदनशील विषयांवर मार्गदर्शन केले.

महाविद्यालयीन आयुष्य व त्यात येणाऱ्या अडचणींवर कशी मात करायला हवी याबाबत सविस्तर मार्गदर्शन या कार्यक्रमात करण्यात आले. त्यानंतर श्रीमती वैशाली अवलगावकर यांनी मुलांना नातेसंबंध व तारुण्यातील होणारे मानसिक बदल हे दैनंदिन जिवनातील उदाहरणा चे दाखले देऊन सांगितले ज्याला मुलांचा उस्फुर्त प्रतिसाद मिळाला. किशोरवयीन मुलींना या वयात होणारे शारीरिक, मानसिक बदल, नातेसंबंधातील बदल, दैनंदिन आयुष्यातील बदल इतर सर्व गोष्टींवर नाट्य, गाणी तसेच खेळ याद्वारे मार्गदर्शन केले. संस्थेच्या स्वयंसेवकांनी मैत्री, प्रेम, आकर्षण यावर एक नाट्य सादर केले. त्यानंतर कार्यक्रमाच्या शेवटी एका खेळाद्वारे मुलांच्या प्रश्नांची उत्तरे सर्व उपस्थित सभासदांनी दिली.

साकारच्या कार्यकारी सदस्य श्रीमती वैशाली अवलगावकर यांनी हा कार्यक्रम घेण्याची संधी दिल्याबद्दल महाविद्यालय व्यस्थापनाचे आभार मानले.



थोडसं बोलूया उपक्रमांतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थी व साकारचे पदाधिकारी व स्वयंसेविका

## क्षितीज

शालेय किशोरवयीन विद्यार्थ्यांसाठी “साकार” संस्था "क्षितिज" हा प्रकल्प गेली वीस वर्ष राबवते. या अंतर्गत दिनांक १३/०२/२०२३ व २३/०२/२०२३ रोजी अनंत भालेराव विद्यालय औरंगाबाद येथे किशोरवयीन विद्यार्थ्यांशी क्षितीज या कार्यक्रमा अंतर्गत संस्थेच्या कार्यकर्त्यांनी संवाद साधला. या कार्यक्रमात इयत्ता सातवी, आठवी व नववीत शिकणाऱ्या मुलामुलींना

१) कुटुंबा चे महत्व,कुटुंबातील नाते संबंध व कुटुंबातील स्वतःची जवाबदारी

२) वाढत्या वयातील शाररिक मानसिक बदल आणि त्यासाठी आवश्यक अन्न घटक

३)वाढत्या वयाबरोबर च जडलेला मोबाईल चां छंद व त्याचे चांगले वाईट परिणाम

४) नैतिक मुल्ये व त्याचे जीवनातील महत्व

५) वैयक्तिक आणि परिसर स्वच्छता. इत्यादी विषयांवर भूमिका नाटय सादर केले व विद्यार्थ्यांना बोलते करून या विषयांवर खेळी मेळीच्या वातावरणात चर्चा घडवून आणली. सर्व विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमास उत्तम प्रतिसाद दिला.



क्षितीज कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना साकारचे सदस्य व स्वयंसेवक उपस्थित सर्व विद्यार्थी व शाळेचे मान्यवर

# कृतज्ञता

बालसंगोपन तसेच दत्तक विधान कार्यात सक्रीय सहकार्य व सहभाग देणाऱ्या आमच्या सर्व भागीदारांचे मनापासून अनेक आभार

## सहकार्य करणाऱ्या शासकीय संस्था

| | | | |
|---|---|---|---|
| १ | मा. उच्च न्यायालय मुंबई | १० | महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय औरंगाबाद |
| २ | केंद्रीय दत्तक संसाधन प्राधिकरण (कारा) नवी दिल्ली | ११ | बाल कल्याण समिती औरंगाबाद |
| ३ | गृह मंत्रालय, भारत सरकार | १२ | एकात्मिक बाल संरक्षण योजना अंतर्गत मिशन वात्सल्य पुणे |
| ४ | महिला व बाल विकास मंत्रालय भारत सरकार | १३ | जिल्हा बाल संरक्षण कक्ष औरंगाबाद |
| ५ | महाराष्ट्र शासन | १४ | पोलीस आयुक्तालय औरंगाबाद |
| ६ | महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे | १५ | सर्व पोलीस स्टेशन व तपास पथके औरंगाबाद जिल्हा |
| ७ | महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण संस्था (सारा) पुणे | १६ | औरंगाबाद महानगर पालिका |
| ८ | विभागीय उपायुक्त महिला व बाल विकास विभाग, औरंगाबाद विभाग कार्यालय, औरंगाबाद | १७ | बाल कल्याण समिती जालना |
| ९ | जिल्हा अधिकारी कार्यालय औरंगाबाद | १८ | सहाय्यक धर्मादाय आयुक्त औरंगाबाद |

## सहकार्य करणाऱ्या सामाजिक संस्था

| | |
|---|---|
| | इंडियन असोसिएशन फॉर द प्रमोशन ऑफ ऍडॉप्शन अँड चाइल्ड वेलफेअर (आय. ए. पी. ए.) |
| १ | सेजल महिला स्वाधार गृह औरंगाबाद |
| २ | शक्ती सदन देवळाली औरंगाबाद |
| | आय प्रोग्रेस फाउंडेशन |
| ३ | विद्यादीप बालगृह छावणी औरंगाबाद |
| ४ | Where Are Children मुंबई |

## सहकार्य करणाऱ्या शैक्षणिक संस्था

| | |
|---|---|
| १ | पंख प्रायमरी व प्री प्रायमरी शाळा औरंगाबाद |
| २ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे सामाजिक कार्य महाविद्यालय औरंगाबाद |
| ३ | अनंत भालेराव विद्यालय औरंगाबाद |

### वैद्यकीय सेवा पुरविणाऱ्या संस्था

| | | | |
|---|---|---|---|
| १ | शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय औरंगाबाद | ७ | डॉ.सोधी केवल केअर रुग्णालय औरंगाबाद |
| २ | अमृत बाल रुग्णालय औरंगाबाद | ८ | काळे पॅथोलोजी लॅब औरंगाबाद |
| ३ | कमलनयन बजाज रुग्णालय औरंगाबाद | ९ | मंगल मेडी सेंटर औरंगाबाद |
| ४ | आयकॉन सेंटर औरंगाबाद | १० | गंगा मेडीको औरंगाबाद |
| ५ | अष्टपुत्रे डेंटल क्लिनीक औरंगाबाद | ११ | दत्ताजी भाले रक्तपेढी औरंगाबाद |
| ६ | तोतला बाल रुग्णालय औरंगाबाद | | |

### वृत्तपत्र व मिडीया समूह

| | | | |
|---|---|---|---|
| १ | दैनिक लोकसत्ता औरंगाबाद | ७ | दैनिक सामना औरंगाबाद |
| २ | दैनिक महाराष्ट्र टाईम्स औरंगाबाद | ८ | द टाईम्स ऑफ इंडिया औरंगाबाद |
| ३ | दैनिक लोकमत औरंगाबाद | ९ | ए.बी.पी. माझा औरंगाबाद |
| ४ | दैनिक दिव्य मराठी औरंगाबाद | १० | झी मिडिया ग्रुप औरंगाबाद |
| ५ | दैनिक सकाळ औरंगाबाद | ११ | ९३.४ रेड एफ एम औरंगाबाद |
| ६ | दैनिक पुण्यनगरी औरंगाबाद | | |

### बाल आरोग्य सेवा

| | |
|---|---|
| १ | डॉ. प्राची पटेल बालरोग तज्ञ औरंगाबाद |
| २ | डॉ. रोशनी सोधी केवल केअर बाल रुग्णालय औरंगाबाद |
| ३ | डॉ. मंदार देशपांडे अमृत बाल रुग्णालय औरंगाबाद |
| ४ | डॉ. मंगेश पानट ऑर्थोपेडिक तज्ञ पानट हॉस्पिटल औरंगाबाद |
| ५ | डॉ. अंतरा देशमुख फिजिओथेरपिस्ट औरंगाबाद |
| ६ | डॉ. प्रिया भाले राजीव स्पीच थेरपी सेंटर औरंगाबाद |
| ७ | श्रीमती मधुरा अन्विकर बाल मानसशास्त्रज्ञ आयकॉन सेंटर औरंगाबाद |
| ८ | डॉ. माधवी शेळके बाल मेंदूविकार तज्ञ औरंगाबाद |
| ९ | डॉ. मोनाली देशपांडे मनोविकार तज्ञ औरंगाबाद |
| १० | डॉ. उदय कुलकर्णी त्वचारोग तज्ञ प्युअर स्कीन क्लिनीक औरंगाबाद |
| ११ | डॉ. अनिरुद्ध नळगीरकर नेत्रतज्ञ कमलनयन बजाज हॉस्पिटल औरंगाबाद |
| १२ | डॉ. वैशाली अष्टपुत्रे दंतरोग तज्ञ औरंगाबाद |

## अंतर्गत तक्रार समिती

| | | |
|---|---|---|
| १ | डॉ. स्मिता अवचार | अध्यक्ष |
| २ | सौ. सुनीता बाजपेयी | संस्था सदस्य |
| ३ | श्री. विजय मगरे | कर्मचारी सदस्य |
| ४ | रेखा तुरुकमारे | कर्मचारी सदस्य |
| ५ | छाया वरेकर | कर्मचारी सदस्य |

साकार संस्थेत एप्रिल २०२२ ते मार्च २०२३ या वर्षात एकही प्रकरण अंतर्गत तक्रार समितीसमोर आले नाही.

# व्यवस्थापन समिती

| अ. क्र. | सदस्याचे नाव | पदनाम | हुद्दा |
|---|---|---|---|
| १ | श्री. महादेव डोंगरे | जिल्हा बाल संरक्षण अधिकारी<br>जिल्हा बाल संरक्षण कक्ष<br>औरंगाबाद | अध्यक्ष |
| २ | श्री. विजय मगरे | प्रभारी व्यक्ती | सदस्य – सचिव |
| ३ | श्री. विजय विघ्ने | परीविक्षा अधिकारी | सदस्य |
| ४ | डॉ. रोशनी सोढी | वैद्यकीय अधिकारी | सदस्य |
| ५ | डॉ. रोशन रानडे | मानसशास्त्रज्ञ/समुपदेशक | सदस्य |
| ६ | सौ. धनश्री शास्त्री | कार्यशाळा पर्यवेक्षक/व्यवसाय निदेशक | सदस्य |
| ७ | सौ. सुषमा पिंपळगावकर | शिक्षक | सदस्य |
| ८ | श्री. प्रदीप शिंदे | सदस्य, बाल कल्याण समिती | सदस्य |
| ९ | -- | बालकांच्या समितीतील बालक प्रतिनिधी | सदस्य |
| १० | सौ. उज्ज्वला निकाळजे<br>सौ. अनिता सिद्धये | बाल संरक्षण याविषयी स्वारस्य व अनुभव असलेली व्यक्ती/प्रतिनिधी | सदस्य |
| ११ | सौ. सुचित्रा देशपांडे | विशेष निमंत्रित सदस्य | सदस्य |

# “साकार” संस्थेचे आधारस्थंभ




**डॉ.सविता पानट**
माजी अध्यक्ष



**सौ. निलीमा सुभेदार**
माजी सदस्य व सल्लागार

# आमचे बालरोगतज्ज्ञ



डॉ. प्राची पटेल



डॉ. रोशनी सोढी

# कार्यकारी सभासद मंडळ



**ॲड. अर्चना गोंधळेकर**

अध्यक्ष



**डॉ. निलीमा पांडे**

उपाध्यक्ष



**सौ. सुचित्रा देशपांडे**

सचिव



**सौ. राधिका मुळे**

कोषाध्यक्ष



**सौ. आशा नानीवडेकर**

कार्यकारी सदस्य



**श्री सुहास वैद्य**

कार्यकारी सदस्य



**डॉ. वीणा पानट**

कार्यकारी सदस्य



**सौ.गौरी शब्दे**

कार्यकारी सदस्य



**सौ. वैशाली अवलगावकर**

कार्यकारी सदस्य

# कर्मचारी वृंद

| अ.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | श्री.तुषार दापके | प्रशासकीय अधिकारी |
| २ | श्री. विजय मगरे | व्यवस्थापक |
| ३ | श्री. विजय राजळे | समाजकार्यकर्ता |
| ४ | सौ. रेखा तुरुकमारे | परिचारिका |
| ५ | सौ. नेहा कुरेशी | परिचारिका |
| ६ | सौ. सुशीला गवई | आया |
| ७ | सौ. छाया वरेकर | आया |
| ८ | सौ. कल्पना वाघ | आया |
| ९ | सौ. पंचशीला काकडे | आया |
| १० | सौ. उषा पठारे | आया |
| ११ | सौ. माया धारुळे | आया |
| १२ | सौ. अनिता खंडाळे | आया |
| १३ | सौ. जयश्री गारोल | आया |
| १४ | सौ. रेखा जाधव | आया |
| १५ | सौ. सुरेखा लोखंडे | आया |
| १६ | सौ. सुनिता जाधव | आया |
| १७ | सौ. नलिनी गणकवार | आया |
| १८ | सौ. शिवशाला खरात | स्वच्छता कर्मचारी |
| १९ | सौ. सीमा गायकवाड | स्वच्छता कर्मचारी |
| २० | सौ. कृष्णा वाहूळ | स्वच्छता कर्मचारी |
| २१ | सौ. ज्योती भुजंग | स्वयंपाकी |
| २२ | सौ. राखी भोसले | चौकीदार |

***